**राज्यात माहे जून ते ऑगस्ट, २०१८ या कालावधीत अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी निधी वितरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसुल व वन विभाग**
**(आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मदत व पुनर्वसन)**
**शासन निर्णय क्रमांक :- एससीवाय-०७/२०१९/प्र.क्र.४५/म-११**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - ०२ ऑगस्ट, २०१९.

<u>संदर्भ</u> :- १) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- सीएलएस-२०१५/प्र.क्र.४०/म-३, दिनांक १३/०५/२०१५.
२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- सीएलएस-२०१८/प्र.क्र.२२७/म-३, दिनांक १०/०७/२०१९.
३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- पुनर्वि-२०१९/२२४५/प्र.क्र.८४/ ब-१,दिनांक २९/०७/२०१९.

**प्रस्तावना :-**

राज्यात माहे जून ते ऑगस्ट, २०१८ या कालावधीत अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी दिनांक २८/०६/२०१९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भ क्रमांक ०२ येथील १०/०७/२०१९ च्या शासन निर्णयान्वये रुपये १३९,१९,१८,०००/-इतका निधी उपलब्ध करुन देण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यानुषंगाने निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासननिर्णय:-**

राज्यात माहे जून ते ऑगस्ट, २०१८ या कालावधीत अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना मदत वाटप करण्यासाठी एकूण रक्कम रुपये १३९,१९,१८,०००/- (अक्षरी रुपये एकशे एकोणचाळीस कोटी एकोणीस लक्ष अठरा हजार फक्त) इतका निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणाली (BEAMS) द्वारे वितरीत करण्यात येत आहे.

२. सन २०१९-२० या चालू वित्तीय वर्षामध्ये मागणी क्रमांक सी-६,२२४५-नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य,०२, पूर, चक्रीवादळे, इत्यादी, १०१ अनुग्रह सहाय्य, (९२) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकाव्यतिरिक्त खर्च, (९२)(१२) पीक नुकसानीमुळे शेतकऱ्यांना सहाय्य,३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (२२४५२३०९) लेखाशीर्षाखाली पुनर्विनियोजनाने उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीमधून रुपये १३९,१९,१८,०००/- (अक्षरी रुपये एकशे एकोणचाळीस कोटी एकोणीस लक्ष अठरा हजार फक्त) इतका निधी विभागीय आयुक्त, कोकण/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/नागपूर/अमरावती यांना खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे वितरीत करण्यात येत आहे. सदर निधी उपरोक्त नमूद लेखाशिर्षाखाली अंतीमत: खर्ची टाकावा.

| विभाग | अर्थसंल्पीय वितरण प्रणालीद्वारे वितरीत रक्कम (रक्कम रुपयात) |
|---|---|
| कोकण | ५०,२२,००० |
| पुणे | २०,५२,२२,३०० |
| नाशिक | १,१८,६८,७०० |
| औरंगाबाद | ४७,००,००,५०० |
| अमरावती | ४३,५१,२३,००० |
| नागपूर | २६,४६,८१,५०० |
| **एकूण** | **१३९,१९,१८,०००** |

३. संबंधित विभागीय आयुक्त यांनी वित्तीय शिस्तीच्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भातील शासन निर्णय १ व २ मधील अटी, शर्तीची पूतर्ता व त्यात नमूद सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी.

४. अर्थसंकल्पिय वितरण प्रणाली (BEAMS) वर उपलब्ध निधी अनावश्यक रितीने कोषागारात आहरीत करुन तो वाटपा अभावी बँकेत पडून राहणार नाही, याची काटेकोर दक्षता घेण्याचे आदेश वेळोवळी देण्यात आलेले आहेत, असे असतानाही कोषागारातून रक्कम आहरीत करुन बँकेत ठेवले असल्याच्या बाबी निदर्शनास आल्या आहेत. यास्तव निधी आहरीत करुन बँकेत ठेऊ नये, अशा सक्त सूचना या शासन निर्णयान्वये पुन:श्च देण्यात येत आहेत. अशी बाब आढळून आल्यास त्याला तात्पुरता अपहार समजून, संबंधितांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

५. सदर निधी ज्या प्रयोजनासाठी वर्ग करण्यात आला आहे, त्याच प्रयोजनासाठी त्याचा वापर होत आहे, याची संबंधित विभागीय आयुक्त, यांनी खातरजमा करावी. निधीच्या वाटपाचे लेखे, अभिलेख / नोंदवहया विहित कार्यपध्दतीनुसार अनुदान आहरित व वितरीत करणाऱ्या कार्यालयाच्या स्तरावर अदयावत ठेवण्यात यावे. त्याचप्रमाणे दरमहा होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाचे विवरणपत्र पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यत संबंधित विभागीय आयुक्त, यांनी एकत्रित महसूल व वन विभागास न चुकता सादर करावे. तसेच झालेल्या खर्चाची महालेखाकार कार्यालयात नोंदविण्यात आलेल्या खर्चाशी पडताळणी करुन त्याबाबतचे **उपयोगिता प्रमाणपत्र** या विभागाकडे तात्काळ सादर करावे. वितरीत करण्यात आलेल्या अनुदानातून जर काही रक्कम खर्ची पडणार नसेल तर ती रक्कम विहित वेळेत शासनास प्रत्यर्पित करण्यात यावी.

६. नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधित व्यक्तींना वाटप करण्यासाठी वितरित करण्यात येणारा निधी तालुकास्तरावरील आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडून लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये हस्तांतरित केला जातो. काही बँका लाभार्थ्यांचे नाव, खाते क्रमांक जुळत नाही, अशा तांत्रिक कारणास्तव परत आलेला निधी निलंबन (Suspense) खात्यात ठेवतात. वास्तविक पाहता

बँकाकडे वर्ग करण्यात आलेली रक्कम एकतर लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होणे आवश्यक आहे किंवा परत आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या खात्यात जमा होणे आवश्यक आहे. तथापि, आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या खात्यात अशा रकमा जमा करण्याऐवजी बँका त्या निलंबन खात्यामध्ये ठेवतात, कालांतराने अशा रकमा ताळमेळविना राहतात आणि ज्या रकमा शासनाकडे परत जमा व्हावयास हव्या त्या बँकाकडे पडून राहतात. याला आळा घालण्यासाठी ठराविक कालावधीने सदर रकमांचा ताळमेळ घेणे अत्यंत गरजेचे आहे. तरी सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी दर आठवडयाला वर्ग करण्यात येणाऱ्या रकमांचा ताळमेळ घेण्याची कार्यवाही करावी. उपयोगिता प्रमाणपत्र सादर करतांना अशा ताळमेळानंतरच लाभार्थ्यांना प्रत्यक्ष वाटप करण्यात आलेल्या रकमा विचारात घेऊन सादर करण्यात यावे.

७. नियंत्रक अधिकाऱ्यांनी अनुदान वाटपाची एक प्रत सचिव (मदत व पुनर्वसन) यांना न चुकता सादर करावी. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी कोषागार/उप कोषागार यांच्याकडे पाठविण्यात येणाऱ्या बिलासोबत जोडल्या जाणाऱ्या संगणक चिठ्ठीमध्ये गौण / उपशिर्षाच्या संगणक संकेतांकाचा न चुकता उल्लेख करावा, असे आदेश कृपया संबंधित अधिकाऱ्यांना नियंत्रण अधिकाऱ्यांनी दयावेत. तसेच कोषागारातून/उप कोषागारातून आहरित केलेल्या रकमेचा अहवाल शासनास सादर करावा.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८०२१५१७४१४४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

RAJASHREE MILIND RAUT

Digitally signed by RAJASHREE MILIND RAUT
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=58e3cf7b9657c2ed6d6d47f01918bccb8dcaac1f1b6f31c7c723db4deb16f5f2, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=6689500497ea8c2084eb7b303b8b2f3922ec7b73b6347d04e043dc0b8ef0fd64, ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAJASHREE MILIND RAUT
Date: 2019.08.02 15:31:14 +05'30'

**(राजश्री राऊत)**
**वित्तीय सल्लागार व सह सचिव**

**प्रति,**

१. मा. मंत्री (म. व पु.) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री (म. व पु.) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
३. मा. सचिव (आपत्ती व्यवस्थापन, म. व पु.) यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय, मुंबई
४. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई /नागपूर
५. विभागीय आयुक्त, कोकण / नाशिक / पुणे / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
६. सर्व जिल्हाधिकारी,
७. संचालक (लेखा व कोषागारे)
८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

९. उपसचिव (म-३), महसूल व वन (म.व पु.) विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. वित्त विभाग (अर्थसं.-३ व ६/व्यय-९/ वित्त आयोग कक्ष ),मंत्रालय,मुंबई-३२,
११. निवडनस्ती ( कार्यासन म-११)